जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१२/२०२/२०२३
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर
सोलापूर दिनांक :-१८/०७/२०२३

प्रति,

१. खातेप्रमुख---------------------------( सर्व),
जिल्हा परिषद,सोलापूर
२. गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, -------------------------( सर्व)
३.गटशिक्षणाधिकारी,कार्यालय,पंचायत समिती, ---------------------( सर्व)
४.तालुका वैदयकिय अधिकारी, ---------------------( सर्व)
५.बालविकास प्रकल्प अधिकारी,एबाविसेयो कार्यालय,प्रकल्प------------------------( सर्व)
६.उपअभियंता,बांधकाम/ग्रा.पा.पु.उ/जलसंधारण उपविभाग, --------------------( सर्व)
७.वैदयकिय अधिकारी,प्राथमिक आरोग्य् केंद्र----------------------------( सर्व)
८.मुख्याध्यापक,जिल्हा परिषद,शाळा,माढा/कुर्डुवाडी

**विषय - अनुकंपा तत्वाखाली नोकरी मिळणेबाबत.**
**संदर्भ - शासन निर्णय,साप्रवि,दिनांक २१.०९.२०१७**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन शासनाने अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या आहेत. त्यातील परिशिष्ठ अ मधील मुद्दा क्र. ७ अ व ब पाहता संबधित आस्थापना अधिकाऱ्यांने अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या योजनेची माहिती शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्युनंतर १५ दिवसानंतर किंवा कुटुंब निवृत्तीवेतनाची कागदपत्रे पाठविताना दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंवियांना त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच सदर माहिती मिळाल्यानंतर संबंधित कुटुंबाकडून पोहोच घेणे आवश्यक आहे. तसेच दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झालेनंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करु शकेल. मात्र तो सज्ञान झालेनंतर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे. हे देखील संबंधितांना लेखी कळविणे हे आस्थापना अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे. असे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार यापुढे दिवंगत शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांना शासन तरतुदीनुसार कुटुंब निवृत्ती वेतन मंजूरीची प्रक्रिया चालू असताना अनुकंपा नियुक्ती बाबतची इत्यंभूत संपूर्ण माहिती देणेत यावी व त्याची पोहोच कार्यालयान दप्तरी ठेवणेत यावी. तसेच अनुकंपा नियुक्तीच्या कार्यपध्दतीबाबतच्या नोंदी स्वतंत्र नोंदवहीमध्ये घेणेत येऊन, त्याचा नियमित आढावा घ्यावा. यापुढे अनुकंपा नियुक्तीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबधित अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही केली जाईल.

दिलीप स्वामी (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

प्रतिलिपी - मा.विभागीय आयुक्त,पुणे विभाग,पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.